# " BEST CONVICTION OF THE MONTH AUGUST 2019 "

दिनांक **१०/१०/२०१९** रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते भरूचा सभाग्रह, सहावा मजला, नविन पोलीस आयुक्त इमारत,पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या **माहे ऑगस्ट –२०१९** या महिन्याचा " BEST CONVICTION OF THE MONTH " चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०२ | **डी.एन.नगर पोलीस ठाणे** | **गु.र.क्र. १२५/२०१५, कलम ३७६ (२) (आय)(एल) भा.द. वि. सह ४, ८, १२ पोक्सो अधि.** |

**‘‘ मंतिमंद मुलीवर जबरी संभोग ’’**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत:–** दिनांक २१/०२/२०१५ रोजी कुपर रूग्णालय येथुन संदेश प्राप्त झाला की, एक मुलगी नामे कु. प्रिया भुपेश गुप्ता ऊर्फ जयस्वाल, वय १५ वर्षे ही ०४ महिन्यांची गरोदर असल्याने तीला औषधोपचाराकामी कुपर रूग्णालय येथे दाखल करण्यात आले आहे. सदर संदेश प्राप्त होताच पो.नि. जाधव यांनी कुपर रूग्णालय येथे जावुन बळीत मुलीचा जबाब घेण्याचा प्रयत्न केला असता बळीत मुलगी ही मंतिमंद असल्याने तीचा जबाब नोंद करता आला नाही. बळीत मुलीजवळ तीची आई नामे श्रीमती फुलकुमारी भुपेश गुप्ता, वय ३८ वर्षे हया हजर होत्या. त्यांचा जबाब नोंद करून अज्ञात इसमाविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | फुलकुमारी भुपेश गुप्ता उर्फ जयस्वाल |
| **बळीत/मयत** | :– | कु. प्रिया भुपेश गुप्ता ऊर्फ जयस्वाल, वय १५ वर्षे |
| **आरोपी अटक व दिनांक** | :– | मोहम्मद हारूण मकबुल अन्सारी, वय ३१ वर्षे,<br>पत्ता– अहमद स्टोअर्स, समता नगर, नुरी मस्जीद समोर, गुलमोहर क्रॉस रोड, अंधेरी (प.), मुंबई.<br>अटक दिनांक ३१/०३/२०१५ रोजी २१.३० वा. |
| **निकाल दिनांक** | :– | ३१/०८/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :– | नमुद गुन्हयाची मा. सत्र न्यायाधिश सो, १८ वे सत्र न्यायालय, मुंबई अटक आरोपी नामे मोहम्मद हारूण मकबुल अन्सारी, वय ३१ वर्षे यास गुन्हयामध्ये दोषी ठरवुन त्यास जन्मठेप व रू. १०,०००/– दंडाची शिक्षा सुनावलेली आहे. |

**तपास कौशल्य :–** दिनांक २१/०२/२०१५ रोजी कुपर रूग्णालय येथुन संदेश प्राप्त झाला की, एक मुलगी नामे कु. प्रिया भुपेश गुप्ता ऊर्फ जयस्वाल, वय १५ वर्षे ही ०४ महिन्यांची गरोदर असल्याने तीला औषधोपचाराकामी कुपर रूग्णालय येथे दाखल करण्यात आले आहे. सदर संदेश प्राप्त होताच पो.नि. जाधव यांनी कुपर रूग्णालय येथे जावुन बळीत मुलीचा जबाब घेण्याचा प्रयत्न केला असता बळीत मुलगी ही मंतिमंद असल्याने तीचा जबाब नोंद करता आला नाही. बळीत मुलीजवळ तीची आई नामे श्रीमती फुलकुमारी भुपेश गुप्ता, वय ३८ वर्षे हया हजर होत्या. त्यांचा जबाब नोंद करून अज्ञात इसमाविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचा तपास चालू असताना तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ परिसरात वारंवार भेट

देवुन घटनास्थळ परिसरात पाहीजे आरोपीताबाबत माहीती प्राप्त केली असता एका वायरमनने नमुद बळीत मुलीला ०४ महीन्यांपुर्वी एका किराणा दुकानामध्ये दुकानदारासह पाहीलेले असल्याचे सांगीतले. सदर माहीतीच्या अनुषंगाने किराणा दुकानदार मोहम्मद हारूण मकबुल अन्सारी, वय ३१ वर्षे यास पोलीस ठाण्यास आणुन त्याच्याकडे तपास केला असता त्याचा गुन्हयातील सहभाग स्पष्ट झाल्याने नमुद गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे.

- सोबत जोडलेल्या यादीतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अथक प्रयत्न करून, कौशल्यपुर्ण तपास करून गंभीर व संवेदनशील आणि स्थानिक परिसरात भर वस्तीमध्ये घडलेला बलात्कारासारख्या गुन्हयातील आरोपीतास मा. न्यायालयात कठोर शिक्षा व्हावी याकरीता साक्षी पुराव्याची व्यवस्थीत जुळवणी करून साक्षीदारांना वेळोवेळी मा. न्यायालयात हजर केलेले आहे. त्यामुळे अटक आरोपीतास प्राप्त पुराव्याच्या आधारे मा. न्यायालयाने जन्मठेप व रू. १०,०००/— दंडाची शिक्षा सुनावलेली आहे.

- **मा. पोलीस आयुक्तांनी माहे ऑगस्ट—२०१९ चे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कुष्ठ गुन्हे** दोषसिध्दी या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **डी.एन.नगर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | व.पो.नि. | परमेश्वर बाबासाहेब गणमे |
| २ | पो.नि. | आनंद ज्ञानदेव जाधव |
| ३ | पो.उ.नि. | स्वप्नील मारूती मांजरे |
| ४ | पो.ना.क्र.९६०७८५ | शिवाजी जगन्नाथ शिंदे |
| ५ | म.पो.शि. ११२४८ | सुरेखा बबन पोटरे |